# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/ /२०१४/806
दिनांक १९/११/२०१४

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, उस्मानाबाद.

**विषय :'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक बाबत...**

**संदर्भ** : आपले पत्र जा.क्र.निवडणुक/कृती कार्यक्रम/मंजुरी/४२००/सन २०१४ दि.१५/११/२०१४

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- संदर्भिय प्रस्तावाव्दारे आपण उस्मानाबाद जिल्ह्यातील 'ड' वर्गामधील दि. १/०४/२०१३ ते ३१/१०/२०१४ अखेर निवडणुकीस पात्र असलेल्या एकुण १० सहकारी संस्थाच्या निवडणुकीबाबतच्या कृती कार्यक्रमास मंजुरी मिळणेस्तव या कार्यालयास विनंती केलेली आहे.

'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भीय प्रस्तावात नमुद आपल्या जिल्ह्यातील दि.३१/१०/२०१४ अखेर निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील एकुण १० संस्थांचा प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे खालील शर्तीस अधिन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील त्या त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिंना प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेसही प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांची मुदत असेल याची दक्षता घ्यावी.
२. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत कराव्यात.
३. 'ड' वर्गात समाविष्ट नसलेल्या संस्थांच्या निवडणुकीकरता प्राधिकृत अधिकारी नेमता येणार नाहीत असे झाले नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.
४. प्रमाणित लेखापरीक्षक ज्यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नावे सुचविली आहेत ते नामतालिकेवर असल्याची पुन:श्च खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याला अवगत करणे पुर्वीच करावी.

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत** : माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणुक अधिकारी

**परिशिष्ट "अ"**

**राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग**

**सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४**

**दि. १९ / ११ /२०१४ चे आदेशासोबतचे परिशिष्ट उस्मानाबाद**

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | अ.क्र. | सहकारी संस्थेचे नांव | विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्षाचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वाशी | १ | गणेश पाणी वापर सहकारी संस्था,मर्या., पिंपळगांव | एस.एस.देवकर, प्र.ले.प. कळंब |
| २ | | २ | नरसिंह पाणी वापर सहकारी संस्था,मर्या., इंदापुर | आय.के.खोसे प्र.ले.प. ,भुम |
| ३ | | ३ | खंडेश्वरी पाणी वापर सहकारी संस्था,मर्या., कडकनातवाडी . | आय.के.खोसे प्र.ले.प. ,भुम |
| ४ | भुम | १ | भागीरथी पाणी वापर सहकारी संस्था,मर्या., माणकेश्वर | आय.के.खोसे प्र.ले.प. ,भुम |
| ५ | | २ | विठठल पाणी वापर सहकारी संस्था,मर्या., जांब | गणेश वीर प्र.ले.प. भुम |
| ६ | | ३ | स्वामी समर्थ पाणी वापर सहकारी संस्था,मर्या., आंजनसोंडा | मोटे .एस.आर. प्र.ले.प., |
| ७ | | ४ | मारुती पाणी वापर सहकारी संस्था,मर्या., हिवर्डा | गणेश वीर प्र.ले.प. भुम |
| ८ | | ५ | राजमाता जिजाऊ पाणी वापर सहकारी संस्था,मर्या.,ईट | गोपने .जी.एम. ,सचिव |
| ९ | | ६ | कै.महारुद्र (बप्पा) मोटे पाणी वापर सहकारी संस्था,मर्या.,आरसोली. | लक्ष्मीकांत घुटे पाटील प्र.ले.प. ,भुम |
| १० | | ७ | पद्मसिंह पाटील पाणी वापर सहकारी संस्था,मर्या.,भुम | नंदकुमार खारगे, लिपीक वि.का.संस्था, |

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे

( डॉ.आनंद जोगदंड )
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य,पुणे.